*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XI / Issue – I* *ISSN 2277-8063*

# शाहू महाराज आणि आरक्षण धोरण

**दौलत भुजंगा साळवे**, राज्यशास्त्र अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतिबा फुलेंनंतर पश्चिम महाराष्ट्रात फुलेंचा सामाजिक वारसा पुढे घेऊन जाणारे राजर्षी शाहू महाराज सामाजिक परिवर्तनाच्या प्रणेते होते. ब्रिटिश सरकारच्या अधिपत्याखाली राहूनही राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक स्तरावर क्रांतिकारक योजना आखून त्यांची प्रतिकुल सामाजिक परिस्थितीमध्ये कठोरपणे अंमलबजावणी केली. महात्मा फुलेंच्या सामाजिक विचारांशी एकनिष्ठ राहून राजषी शाहू महाराजांनी समाज परिवर्तनाची चळवळ पुढे नेली. अनेक वर्षांपासून संस्थानातील गोरगरीब जनता अज्ञान व अंधश्रद्धेच्या अंधकारात चाचपडत होती. या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी राजषी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या. तसेच त्यांनी बहुजन समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती होण्यासाठी संस्थानात आरक्षणासारखे धोरण राबवून त्याची कठोरपणे अंमलबजावणी केली. आरक्षण म्हणजे हजारो वर्षे उपेक्षित ठेवल्या गेलेल्यांसाठी नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक न्याय आहे. तो दिल्याशिवाय सामाजिक न्याय अस्तित्त्वात येणार नाही, याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. त्याच्या या निर्णयाचा व त्याच्या परिणामाचा प्रस्तुत लेखात मांडणी केली आहे.

**उद्देश :**

१.आरक्षण या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२.आरक्षणाची समाजाला गरज आणि शाहू महाराज यांचे त्या बद्दल विचारांचा अभ्यास करणे.

३. शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक धोरणाची चिकित्सक पद्धतीने विचारांचा अभ्यास करणे

**आरक्षण :**

आरक्षण हा शब्द सकारात्मक, रक्षात्मक भेदभाव, संरक्षणात्मक विभेदीकरण या अर्थाने वापरला जातो. दुर्बल, वंचित घटकांना विशेष सबलत आरक्षणाचा मूळ अर्थ आहे. समतेसाठी असमानता दूर करून समता, न्याय प्रस्थापित करण्यासाठी आरक्षण हा एक मार्ग आहे. आरक्षणाच्या माध्यमातून बहिष्कृत समाज घटकांस इतर प्रस्थापित समाज घटकांबरोबर आणण्याची सकारात्मक दृष्टिकोनातून प्रयत्न यशस्वी होऊ शकतो.

आरक्षण हे साध्य नव्हे. आरक्षण हे साधन आहे. केवळच आर्थिक नव्हे तर एकूणच सांस्कृतिक समाजवादाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली प्रक्रिया आहे. आरक्षण ही आदर्श समाजाच्या किनाऱ्यावर माणसांना नेऊन सोडणारी नाव आहे. आदर्श समाजाचे वास्तव ते नव्हे. आरक्षण द्यावे लागणे हा व्यक्तीचा वा व्यक्तींच्या समूहाचा सन्मान नव्हे तर या व्यक्ती समूह ज्या समाजात राहतात त्या समाजाचे, त्याच्या संस्कृतीचे आणि त्याच्या माणुसकीचे ते अपयश आहे. आरक्षण अशा समाजाच्या सर्वच पातळीयांवरील अपयशाचे निर्मूलन करणारी योजना आहे. आरक्षण घेणाऱ्यांची मान लाजेने खाली जाण्यापेक्षा ज्या समाजात असे आरक्षण हा एखाद्या संस्कृतीच्या विजयाचा पुरावा नव्हे तर तो तिच्याकृपणाचा अत्यंत घृणास्पद दाखला आहे. यातूनच कोणत्याही गोष्टीमुळे आलेला सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा घालवून त्यांची उन्नती साधणे संपूर्ण नागरी जीवन समपातळीत आणणे ही एकूणच आरक्षणाची उद्देशपत्रिका आहे.

**शाहू महाराजांनी व्यवस्थेत ब्राह्मण वर्चस्वाला धक्का दिला:**

वेदोक्त प्रकरण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वादास शाहू छत्रपतींच्या जीवनात तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातही फार महत्त्वाचे स्थान आहे. "वेदोक्त प्रकरणाची मुळे थेट शिवाजीच्या काळापर्यंत जाऊन भिडतात. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी हाच वाद निर्माण झाला होता".(फडके,(१९८६):४३) १८९९ च्या अखेरपासून शाहू छत्रपतींना वेदोक्ताच्या वादात परंपरानिष्ठ ब्राह्मणाविरुध्द निकराची लढत द्यावी लागली. यावेळी नारायण भटजी या पुरोहिताने शूद्रांना पुराणोक्त मंत्रच म्हणावयाचे असतात असे स्पष्ट केले. शाहू महाराजांच्या अपमानामुळे संपुर्ण बहुजन समाज एक झाला व त्यांच्या मनात ब्राह्मणा विषयी रोष खदखदू लागला. या प्रकरणामुळे त्यांनी संस्थानात ब्राह्मणाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी संघर्ष सुरु केला. यात त्यांनी संस्थांच्या प्रशासनात ब्राह्मणांचा प्रभाव कमी केला, ब्राह्मणांचे प्रशासन मंडळातील वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला, हुजूर ऑफिसच्या निर्मितीने ब्राह्मण वर्चस्वाला धक्का दिला, ब्राह्मणेत्तर वर्गातून भरती करण्यास सुरुवात केली, संस्थानच्या नोकऱ्यांत मागासवर्गाला ५० टक्के आरक्षण देण्याचे ठरवले, पाटील स्कूलची स्थापना (१९१२) व कुलकर्णी वतनांची अखेर व ग्राम पंचायतींची स्थापना केल्या इत्यादी तरतुदी केल्या यातील

त्यांची आरक्षण विषयक धोरण प्रभावी ठरले यामुळे बहुजन समाजाला विकासाची व समाजातील प्रवाहात सामील होण्याची संधी निर्माण झाली.

**शाहू महाराज यांचे आरक्षण धोरण :**

समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन अनेक क्रांतिकारी धोरणाचा अवलंब केला. त्यांच्या या धोरणांला महात्मा फुल्यांनी प्रेरणा मिळालेलिऊ आहे. त्याच्या आरक्षणा धोरणात महात्मा फुले यांच्या विचाराची आणि कार्याची प्रेरणा मिळालेली दिसून येते. शाहू महाराज यांनी दलित व मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचे विचारच मांडले नाही तर ते सत्ता हातात आल्यावर त्याची अंमलबजावणी कोल्हापूर संस्थानात केली. त्यांनी इंग्रजाशी सहकार्य करून आपणास प्राप्त झालेल्या राजकीय सत्तेचा आणि अधिकाराचा वापर करून बहुजन समाजाच्या विकास करण्याचे धोरण अवलंबले. यानुसार २६ जून १९०२ रोजी आरक्षणाचा क्रांतीकारी जाहीरनामा प्रसिध्द केला. ज्यामध्ये मागासलेल्या वर्गातून भराव्यात आणि ज्या ज्या ऑफिसमध्ये मागासवर्गातील अमंलदाराचे प्रमाण सद्या पन्नास टक्क्यापेक्षा कमी असेल तेथे पुढील नेमणूक मागासवर्गातील व्यक्तिंची करावी. याच जाहीरनाम्यात दर तीन महिन्यांनी प्रत्येक खात्याच्या प्रमुखाने पत्रक सरकारला पाठवावे. त्याच प्रमाणे या जाहिरनाम्यात मागासलेल्या अधिकार मिळावे असे तरतूद करण्यात आली. या आरक्षण धोरणामुळे शासनाच्या कारभारात बहुजनांस्थान मिळाले. याबात धनंजय कीर करताना म्हणतात "नविन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत होय" असे म्हटले आहे. पण त्यांच्या या निर्णयाचा सुध्दा उच्चभ्रू वर्गातून टीका व निषेध झाला आहे . असे असले तरी शाहू महाराज यांनी आपला निर्णय मागे न घेता तो कठोरपणे अवलंबला. संस्थानात लोकसंख्येचा विचार करता ब्राम्हण व इतर उच्चवर्णीयांची ३ टक्के पुढारलेल्या जातीच्या लोकासाठी ५०टक्के सरकारी नोकऱ्या तर उरलेल्या ९७ टक्के बहुजन समाजासाठी ५० टक्के सरकारी नोकऱ्यात आरक्षण ठेवल्याने काय होणार आहे. तरी पण ब्राम्हण वर्गाचे याचा विरोध केला. हा विरोध शाहु महाराजांनी संयमाने व निर्धारपणे तोंड हाताळला आहे. अशा पद्धतीने त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढून त्यांनी अस्पृश्य समाजासाठी क्रांतीकारक विचारधार राबवली.

**सारांशा :**

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. तसेच मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.

**संदर्भसूची :**

१. भगत, रा(२०१६) .तु ., "राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षणकार्य -", रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

२. जाधव, नरेंद्र (१९८०), "महाराष्ट्रातील मानचिन्हे", मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे

३. नांदेडकर, प्रा. डॉ. व. गो. (२०११), "राजकीय विचार आणि विचारवंत", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

४. प्रा ,कडवे रघुनाथ ."लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज", शशी प्रकाशन, गणेशनगर, बोरगाव मेघे, तावर्धा .जि., द्वितीय आवृत्ती,

५. लड्ठे आबा" ,श्री"शाहू छत्रपती यांचे चरित्र ., टाईम्स ऑफ इंडिया प्रेस, मुंबई